PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Chandanachi Choli Ang Ang Jali
Year: 1975

Song: Nach Ga Ghuma

Lyricist: Jagdish Khebudkar

नाच गं घुमा
कशी मी नाचू
नाच गं घुमा
कशी मी नाचू
नाच गं घुमा
कशी मी नाचू
नाच गं घुमा
कशी मी नाचू
नाच गं घुमा
ह्या गावचा त्या गावचा
सोनार न्हाई आला
जोडवी न्हाई मला
कशी मी नाचू
नाच गं घुमा
कशी मी नाचू
नाच गं घुमा
कशी मी नाचू
नाच गं घुमा
ह्या गावचा त्या गावचा
शिंपी न्हाई आला
चोळी न्हाई मला
कशी मी नाचू
नाच गं घुमा
कशी मी नाचू
नाच गं घुमा
कशी मी नाचू
नाच गं घुमा
ह्या गावचा त्या गावचा
कासार न्हाई आला
बांगडी न्हाई मला
कशी मी नाचू
नाच गं घुमा
कशी मी नाचू
नाच गं घुमा
कशी मी नाचू
नाच गं घुमा
कशी मी नाचू
नाच गं घुमा

फू बाई फू फुगडी
चम चम करतीया बुगडी
फू बाई फू फुगडी
चम चम करतीया बुगडी
पाट बाई पाट चंदनाचा पाट
पतीदेव बघत्यात माडीवर वाट
पाट बाई पाट चंदनाचा पाट
पतीदेव बघत्यात माडीवर वाट
फू बाई फू फुगडी
चम चम करतीया बुगडी
फू बाई फू फुगडी
चम चम करतीया बुगडी
फू फू फू फू

बारा घरच्या बायका
एक जागी खेळूया
बारा घरच्या बायका

एक जागी खेळूया
चला झिम्मा खेळू या गं
चला झिम्मा खेळूया
चला झिम्मा खेळू या गं
चला झिम्मा खेळूया
चला झिम्मा खेळू या गं
चला झिम्मा खेळूया
चला झिम्मा खेळू या गं
चला झिम्मा खेळूया

एक बोलते लाडकी
घरी गोकुळ साजणी
एक बोलते लाडकी
घरी गोकुळ साजणी
वसुदेव देवकीचा
कान्हा खेळतो अंगणी
वसुदेव देवकीचा
कान्हा खेळतो अंगणी
बाळ नावसाचा माझा
त्याची दृष्ट काढूया
चला झिम्मा खेळू या गं
चला झिम्मा खेळूया
चला झिम्मा खेळू या गं
चला झिम्मा खेळूया
चला झिम्मा खेळू या गं
चला झिम्मा खेळूया

घुमू दे घागर घुमू दे
खेळात जीव ह्यो रमू दे
घुमू दे घागर घुमू दे
खेळात जीव ह्यो रमू दे
गडणी घागर फुकतीया
मागं नि म्होरं झुकतीया
गडणी घागर फुकतीया
मागं नि म्होरं झुकतीया
नाचून बाई माझी दमू दे
खेळात जीव ह्यो रमू दे
नाचून बाई माझी दमू दे
खेळात जीव ह्यो रमू दे
घुमू दे घागर घुमू दे
खेळात जीव ह्यो रमू दे
घुमू दे घागर घुमू दे
खेळात जीव ह्यो रमू दे

पोरी पिंगा गं
पोरी पिंगा गं
पोरी पिंगा गं पोरी पिंगा
तुझ्या पिंग्यानं मला बोलिवली
रात जागवली पोरी पिंगा
पोरी पिंगा गं
पोरी पिंगा गं
पोरी पिंगा गं पोरी पिंगा

फेटा बांधल्याला
भाऊ माझा गं
जावई तुझा गं पोरी पिंगा
तुझ्या पिंग्यानं मला बोलिवली
झोप चाळीवली पोरी पिंगा
शालू नेसल्याली भईन माझी गं
सून तुझी गं पोरी पिंगा
तुझ्या पिंग्यानं मला बोलिवली
मागं घालिवली पोरी पिंगा
पोरी पिंगा गं
पोरी पिंगा गं

Literacy for a Billion

पोरी पिंगा गं पोरी पिंगा
तुझ्या पिंग्यानं मला बोलिवली
रात जागवली पोरी पिंगा
भाऊ माझा गं शोभं राजा गं
आगं जा जा गं पोरी पिंगा
तुझ्या पिंग्यानं मला बोलिवलं
मला भोळीवलं पोरी पिंगा
तुझ्या भावाचं डोळं चकणं गं
रूप हेकणं गं पोरी पिंगा
भईन माझी गं लेक इंद्राची
कोर चंद्राची पोरी पिंगा
पोरी पिंगा गं
पोरी पिंगा गं
पोरी पिंगा गं पोरी पिंगा
तुझ्या पिंग्यानं मला बोलिवली
रात जागवली पोरी पिंगा
तुझ्या बहीणीचं नाक नकटं गं
त्वांड चपटं गं पोरी पिंगा
माझ्या भावाचा भारी दरारा
पळती फरारा सारे पिंगा
भाऊ तुझा गं भितो झुरळाला
काळ्या उंदराला पोरी पिंगा
भईन माझी गं जशी कोकीळा
गाते मंजुळा पोरी पिंगा
पोरी पिंगा गं
पोरी पिंगा गं
पोरी पिंगा गं पोरी पिंगा
तुझ्या पिंग्यानं मला बोलिवली
रात जागवली पोरी पिंगा
तुझ्या बहिणीचं काय नरडं गं
कावळा वरडं गं पोरी पिंगा
अशा बहिणीला कोण आणणार
कशी नांदणार पोरी पिंगा
भईन माझी गं जाई बावरून
घेई सावरून पोरी पिंगा
तुझ्या पिंग्यानं मला बोलिवलं
लुगडं नेशीवलं पोरी पिंगा
पोरी पिंगा गं
पोरी पिंगा गं
पोरी पिंगा गं पोरी पिंगा
तुझ्या पिंग्यानं मला बोलिवली
रात जागवली पोरी पिंगा
पोरी पिंगा गं
पोरी पिंगा गं
पोरी पिंगा गं पोरी पिंगा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*